MHRT030018632019

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | -- | २८/०८/२०१९ | | |
| नोंदणी तारीख | -- | २८/०८/२०१९ | | |
| निकाल तारीख | -- | १६/०६/२०२६ | | |
| कालावधी | -- | वर्षे | महिने | दिवस |
| | | ०६ | ०९ | १९ |

**रत्नागिरी येथील मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी श्रीम.एस.एस.पिंगळे यांचेसमोर)

**न्यायनिर्णय दिनांकः – १६/०६/२०२६**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक १३४/२०१९**
**निशाणी क्र. ५०**
पुर्णगड सागरी पोलीस ठाणे गु.र.क्र.२४/२०१९

**फियादी/सरकार पक्ष** — **महाराष्ट्र सरकार** तर्फे पोलीस ठाणे अधिकारी,
पुर्णगड सागरी पोलीस ठाणे, ता. जि. रत्नागिरी.

**सरकार पक्षातर्फे** — सहा. सरकारी अभियोक्ता श्री.पी.ए.सावंत.

**आरोपी** — **प्रकाश शांताराम पवार,**
वय सुमारे ४३ वर्षे, व्यवसाय – मासेमारी,
रा. शिवार आंबेरे, लाखणवाडी, ता. जि. रत्नागिरी.

**आरोपीतर्फे वकील** — श्री.ए.एल.चवंडे.

| | |
|---|---|
| गुन्हा तारीख | १९/०४/२०१९ |

| | |
|---|---|
| पहिली खबर तारीख | २०/०४/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २६/०८/२०१९ |
| दोषारोप निश्चीतीची तारीख | २०/११/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०७/११/२०२२ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | १६/०६/२०२६ |
| शिक्षेची तारीख, लागू असल्यास | -- |

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर खुले केल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा | दिलेली शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान निरुद्धकेलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रकाश शांताराम पवार | २२/०४/२०१९ | २२/०४/२०१९ | भा.दं.वि.क. ४५२, ३२४, ५०४, ५०६ | निर्दोष मुक्त | -- | -- |

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | सुजाता गंगाराम लाखण | २१ | फिर्यादी |
| २. | राजन भिवा रोकडे | २४ | घटनास्थळ पंच |
| ३. | गंगाराम कृष्णा लाखण | २६ | साक्षीदार |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | मनिषा मनोहर लाखण | २८ | साक्षीदार |
| ५. | डॉ. अतुल ज्ञानदेव ढगे | ३२ | वैद्यकीय अधिकारी |
| ६. | जितेंद्र महादेव शिर्सेकर | ३४ | साक्षीदार |
| ७. | लक्ष्मण परशुराम रोकडे | ४१ | साक्षीदार |

**बचाव पक्षातर्फे साक्षीदारांची यादी**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| — | — | — | —— |

**न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| —— | —— | —— | —— |

**अभियोग पक्षातर्फे दाखल कागदपत्र**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १. | २२/स.सा.क्र.१ | लेखी फिर्याद |
| २. | २५/स.सा.क्र.२ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | ३३/स.सा.क्र.५ | सुजाता गंगाराम लाखण यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र |

**बचाव पक्षातर्फे मान्य केलेली कागदपत्र**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| —— | —— | —— |

## बचाव पक्षातर्फे दाखल केलेली कागदपत्र

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## न्यायालयीन कागदोपत्री निशाण्यांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | वस्तू क्र.१ | हाताचे बचक्यात मावेल एवढा जांभा दगड |

..............................................

## न्यायनिर्णय

( खुल्या न्यायालयात जाहीर )

१. आरोपीच्या विरुद्ध भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४५२, ३२४, ५०४, ५०६ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –

यातील फिर्यादी–सौ. सुजाता गंगाराम लाखण ही शिवार आंबेरे, लाखणवाडी, ता. जि. रत्नागिरी येथे तिचे पतीसोबत रहाते. आरोपी हा तिचा शेजारी असून त्याला दारुचे व्यसन आहे. तो दारु पिवून त्यांना व शेजारपाजाऱ्यांना नाहक शिवीगाळ करुन धमक्या देत असतो. दिनांक १९/०४/२०१९ रोजी संध्याकाळी ०७.३० वा. आरोपी दारु पिवून फिर्यादीचे घराजवळ आला व तिचे नवऱ्याला शिव्या देत होता. तो नवऱ्याचे नाव घेवून,

'दरवाजा उघड' असे ओरडत होता. त्यावेळी ती एकटीच घरी होती. त्यानंतर दरवाजाला धक्का मारुन आरोपी घरात घुसला व त्याच्या हातातील दगड त्याने फिर्यादीच्या उजव्या पायाच्या ढोपराखाली मारुन ''रांडेच्यानू तुम्हाला ठार मारतो'' असे बोलून अर्वाच्य शिवीगाळ करुन निघून गेला. त्यामुळे फिर्यादीने पुर्णगड सागरी पोलीस ठाणे येथे आरोपीचे विरुद्ध लेखी फिर्याद दाखल केली.

३.　　　　त्या अनुषंगाने, पूर्णगड सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्र.२४/२०१९ दाखल झाला. त्याचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री.आर.ए.कांबळे व पोलीस नाईक श्री. एन.एस.नावळेकर यांनी केला. तपास अधिकारी यांनी तपासकामी घटनास्थळाचा पंचनामा केला, घटनास्थळाचा कच्चा नकाशा काढला, फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले, साक्षीदारांची टिपणे नोंदवली व तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीचे विरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४.　　　　माझे पूर्व पिठासीन अधिकाऱ्यांनी आरोपीच्या विरुद्ध निशाणी ०७ अन्वये, भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४५२, ३२४, ५०४, ५०६ अन्वये दंडनीय अपराध केल्याबाबत, दोषारोप विरचित केला. त्यामधील मजकूर आरोपीला वाचून आणि समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षा घेण्याचे सुचविले. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन निशाणी क्र. ४९ येथे नोंदवण्यात आले. त्यामध्ये आरोपीने संशयावरुन खोट्या खटल्यात गुंतवल्याचा बचाव घेतला.

५.　　　　माझ्यासमोर आलेले प्रश्न आणि त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक १९/०४/२०१९ रोजी संध्याकाळी ०७.३० | |

| | | |
|---|---|---|
| | वाजण्याचे सुमारास शिवार आंबेरे, लाखणवाडी, ता.जि. रत्नागिरी येथे आरोपीने फिर्यादीच्या रहात्या घरामध्ये तिला दुखापत पोहोचवण्याच्या तयारीने गृह प्रवेश केला व भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४५२ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नकारार्थी |
| २. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीच्या उजव्या पायाच्या ढोपराखाली दगडाने की, जो गुन्ह्यात हत्यार म्हणुन वापरला तर मृत्यू येवू शकतो, त्याने मारुन तिला इच्छापुर्वक दुखापत पोहोचवली व भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नकारार्थी |
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीला तिच्या हातून सार्वजनिक शांतता भंग व्हावी किंवा अन्य कोणता तरी अपराध घडावा या उद्देशाने शिवीगाळ करुन तिचा इच्छापुर्वक अपमान केला व भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ५०४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नकारार्थी |
| ४. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीला ठार मारण्याची धमकी दिली व भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ५०६ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नकारार्थी |
| ५. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

# कारणमीमांसा

**प्रश्न क्रमांक १ ते ४ बाबत : –**

६. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी–सुजाता (स.सा.क्र.१) हिने तिच्या साक्षीमध्ये (नि.क्र.२१) असे कथन केले आहे की, दिनांक १९/०४/२०१९ रोजी सायंकाळी साडे सात वाजता ती तिच्या घरात होती. त्या दिवशी आरोपी पवार याने तिच्या घराचा दरवाजा उघडला. आरोपी तिच्या घराजवळ राहतो. घटनेच्या वेळी ती दिराच्या घरात रहात होती. त्यावेळेस तो दारु प्यायलेला होता. त्याने दरवाजा उघडून तिच्या उजव्या पायावर दगड मारल्यामुळे जखम झाली. त्यानंतर तिने आरडाओरडा केला. त्यावेळी माणसे जमली होती. घटनेच्यावेळी आरोपी तिला व तिच्या नवऱ्याला घाण शिव्या देत होता. त्यावेळेस तिचा नवरा घरात नव्हता. त्यानंतर तिला सिव्हील हॉस्पीटल, रत्नागिरी येथे नेण्यात आले. फिर्याद (नि.क्र.२२) वर तिचा अंगठा आहे. घटनास्थळी पोलीस आले होते. घटनास्थळ तिने स्वतः दाखविले. त्यांनी तिच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला.

७. साक्षीदार ही स्वतः फिर्यादी असून प्रकरणातील पीडित व्यक्ती आहे. त्यामुळे तिचा पुरावा पूर्णपणे नाकारता येत नसला तरी तो स्वतंत्र व निःपक्षपाती पुराव्याने पुष्टी होणे आवश्यक आहे. उलटतपासात साक्षीदाराने कबूल केले आहे की, आरोपीबरोबर त्यांचे संबंध चांगले नव्हते. त्यामुळे आरोपीविरुद्ध पूर्वीपासून वैमनस्य अस्तित्वात असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत, तिच्या एकट्या साक्षीकडे सावधगिरीने पाहणे आवश्यक ठरते. साक्षीदाराने आरडाओरडा केल्यानंतर अनेक लोक जमा झाल्याचे सांगितले आहे. मात्र अशा कोणत्याही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा पुरावा सरकार पक्षाने सादर केलेला नाही. उपलब्ध असलेला सर्वोत्तम पुरावा न्यायालयासमोर न आणल्याने सरकार पक्षाच्या कथनावर शंका निर्माण होते.

८. साक्षीदाराने दगडाने मारल्याचे सांगितले असले तरी वस्तू क्र. १ दगड हा प्रत्यक्ष गुन्ह्यात वापरण्यात आलेलाच दगड आहे याचा ठोस व स्वतंत्र पुरावा उपलब्ध असल्याचे

दिसून येत नाही. त्यामुळे दुखापत व आरोपी यांच्यातील संबंध संशयातीतरीत्या सिद्ध होत नाही. साक्षीदार क्र. २ राजन रोकडे याचा पुरावा तपासल्यास हा साक्षीदार केवळ घटनास्थळ पंचनाम्याचा पंच असून तो प्रत्यक्ष घटनेचा साक्षीदार नाही. त्यामुळे त्याचा पुरावा मर्यादित स्वरूपाचा असून तो आरोपीच्या सहभागाचा थेट पुरावा ठरत नाही. साक्षीदार क्र. २ राजन रोकडे हा घटनेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक २०/०४/२०१९ रोजी घटनास्थळी गेला असल्याचे सांगतो. तो घटना घडत असताना उपस्थित नव्हता. त्यामुळे आरोपीने फिर्यादीला मारहाण केली, शिवीगाळ केली अथवा धमकी दिली याबाबत त्याला कोणतेही प्रत्यक्ष ज्ञान नाही. म्हणून त्याची साक्ष केवळ पंचनाम्यापुरती मर्यादित राहते आणि आरोपीच्या दोषारोपास स्वतंत्र आधार देऊ शकत नाही. सरतपासात साक्षीदार म्हणतो की, "फिर्यादीला घटनास्थळी दगड मारून जखमी केलेले होते." मात्र ही बाब त्याने स्वतः पाहिलेली नाही. घटना त्याच्या उपस्थितीत घडलेली नाही. त्यामुळे हे विधान ऐकीव स्वरूपाचे आहे त्यास फारसे पुरावामूल्य देता येत नाही. उलटतपासात साक्षीदाराने स्पष्टपणे कबूल केले आहे की –"जप्त केलेल्या दगडासारखे कितीतरी प्रकारचे दगड इतरत्र उपलब्ध असतात." या कबुलीमुळे वस्तू क्र. १ हा दगडच गुन्ह्यात वापरण्यात आलेला दगड आहे, हे निश्चितपणे सिद्ध होत नाही. दगडाचे कोणतेही वैशिष्ट्यपूर्ण वर्णन किंवा स्वतंत्र ओळखचिन्ह साक्षीदाराने सांगितलेले नाही. त्यामुळे दगड व कथित गुन्हा यातील संबंध संशयमुक्तरीत्या स्थापित होत नाही.

९.        उलटतपासात साक्षीदाराने कबूल केले आहे की – "पंचनामा पोलीसांनी तयार केलेला होता." म्हणजे पंचनाम्याचा मजकूर पंचाने तयार केलेला नसून पोलीसांनी लिहिलेला आहे. पंचाने फक्त पंचनाम्याच्या प्रक्रियेस उपस्थिती दर्शविली आहे. अशा परिस्थितीत, पंचनाम्यातील प्रत्येक बाब सत्य असल्याचे गृहित धरता येत नाही. सदर साक्षीदाराने कबूल केले आहे की, फिर्यादी त्याच्या चांगल्या परिचयाची आहे. तो त्याच गावातील रहिवासी असून घटनास्थळापासून अवघ्या ५०० ते ७०० मीटर अंतरावर राहतो. यामुळे तो पूर्णपणे स्वतंत्र व निःपक्षपाती साक्षीदार आहे असे म्हणता येत नाही. जरी त्याने पक्षीय संबंध नाकारले असले

तरी फिर्यादीशी असलेला निकट परिचय त्याच्या साक्षीचे मूल्यांकन करताना विचारात घेणे आवश्यक आहे. घटनास्थळ पंचनामा हा केवळ घटनास्थळाची स्थिती दर्शविणारा दस्तऐवज आहे. पंचनाम्यातून आरोपी घटनास्थळी उपस्थित होता,आरोपीनेच दगड मारला, आरोपीने घरात प्रवेश केला, आरोपीने शिवीगाळ किंवा धमकी दिली, अशा बाबी सिद्ध होत नाहीत. म्हणून पंचनामा हा आरोपीच्या ओळखीचा किंवा सहभागाचा पुरावा होऊ शकत नाही.

१०. साक्षीदार क्र. ३ गंगाराम लाखण हा फिर्यादीचा पती असून त्याचा पुरावा तपासल्यास तो प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसून मोठ्या प्रमाणावर ऐकीव स्वरूपाचा असल्याचे दिसून येते. त्याच्या साक्षीतून आरोपीविरुद्धचा गुन्हा संशयातीतरीत्या सिद्ध होत नाही. सरतपासात साक्षीदाराने स्पष्टपणे सांगितले आहे की, तो मॅच पाहण्यासाठी शेजारी गेला होता. घटना घडत असताना तो घरात उपस्थित नव्हता. त्याच्या म्हणण्यानुसार,"आरोपीने माझ्या बायकोला दगड मारल्याचे मला जितेंद्र शिर्सेकर याने सांगितले." यावरून आरोपीने फिर्यादीला दगड मारल्याचे त्याने स्वतः पाहिलेले नसून ते त्याला तृतीय व्यक्तीकडून समजलेले आहे. त्यामुळे आरोपीने दगड मारला हा त्याचा पुरावा ऐकीव असून त्याला स्वतंत्र पुरावामूल्य देता येत नाही. साक्षीदार जेव्हा घरी आला तेव्हा त्याने केवळ पत्नीच्या पायातून रक्त येत असल्याचे पाहिले. त्याने आरोपीला दगड मारताना पाहिलेले नाही. त्यामुळे जखम झाली हे मान्य केले तरी ती जखम आरोपीमुळेच झाली हे त्याच्या साक्षीतून सिद्ध होत नाही. साक्षीदाराने सरतपासात जितेंद्र शिर्सेकर याने आरोपीने दगड मारल्याचे सांगितल्याचा उल्लेख केला आहे. परंतु उलटतपासात त्याने मान्य केले आहे की, "तसे माझ्या जबाबात का नमूद नाही याचे काही कारण मला सांगता येणार नाही." ही अत्यंत महत्त्वाची सुधारणा (Improvement) आहे. जर घटनेबाबतची माहिती जितेंद्र शिर्सेकरकडून मिळाली होती तर ती बाब प्रथम पोलीस जबाबात नमूद होणे अपेक्षित होते. असे न झाल्याने न्यायालयासमोर प्रथमच सांगितलेला हा भाग अविश्वसनीय ठरतो.

११. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४–मनिषा लाखण ही स्वतंत्र साक्षीदार आहे, परंतु तिने अभियोग पक्षाचे कथनास दुजोरा दिलेला नाही, त्यामुळे सहा. सरकारी वकिलांनी तिला उत्तरसूचक प्रश्न विचारले, परंतु तिने घटनेबाबतची सर्व कथने नाकारलेली आहेत. त्यामुळे तिचा पुरावा या कामी ग्राहय धरता येत नाही.

१२. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ – डॉ. अतुल ढगे (वैद्यकीय अधिकारी) त्यांचा पुरावा केवळ फिर्यादीला झालेल्या जखमेचे स्वरूप दर्शवितो. हा पुरावा जखम अस्तित्वात होती हे दाखवतो; मात्र ती जखम आरोपीनेच केली हे सिद्ध करीत नाही. त्यांनी फिर्यादी–सुजाताला तपासून वैद्यकीय दाखला (निशाणी क्र. ३३) दिल्याचे म्हटले आहे. परंतु उलटतपासात आलेल्या कबुलीमुळे बचाव पक्षाच्या पर्यायी बचावाला बळकटी मिळते.

१३. वैद्यकीय अधिकाऱ्यानी "अनेक ओरखडे (Multiple Abrasions) – सर्वात मोठा आकार २ x १ से.मी." अशी दुखापत नमूद केली आहे. ही दुखापत गंभीर स्वरूपाची नाही. कोणतीही हाड मोड, खोल जखम, सूज, रक्तस्रावजन्य गंभीर दुखापत अथवा कायमस्वरूपी परिणाम आढळलेला नाही. जखम केवळ किरकोळ (simple injury) स्वरूपाची असल्याचे दिसून येते. वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये आरोपीचे नाव नमूद नाही. डॉक्टरांनी फिर्यादीने सांगितलेल्या इतिहासाच्या आधारे "हल्ला झाल्याचे सांगितले" असे नमूद केले आहे. कायद्याने रुग्णाने सांगितलेला इतिहास हा प्रत्यक्ष पुरावा नसतो. तो केवळ उपचारासाठी नोंदवलेला निवेदनात्मक भाग असतो. म्हणून त्या आधारे आरोपीचा सहभाग सिद्ध होत नाही.

१४. उलटतपासात डॉक्टरांनी स्पष्ट कबुली दिली आहे की, वैद्यकीय प्रमाणपत्रात नमूद केलेली दुखापत, एखादी व्यक्ती कठीण पृष्ठभागावर पडल्यास होऊ शकते. ही कबुली बचाव पक्षासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. कारण बचाव पक्षाचा संपूर्ण बचाव असा आहे की, आरोपी व फिर्यादीच्या पतीमध्ये वाद झाला होता, ढकलाबुकल झाली होती, फिर्यादी मध्यस्थी

करण्यासाठी आली, त्यावेळी ती पडून जखमी झाली. सरतपासात डॉक्टरांनी असे सांगितले आहे की, "दगडाच्या सहाय्याने प्रहार केल्यास अशी दुखापत शक्य आहे." मात्र त्यांनी असे म्हटलेले नाही की, "ही दुखापत निश्चितपणे दगडामुळेच झाली आहे." दुखापत दगडाने होऊ शकते, तसेच पडल्यानेही होऊ शकते. त्यामुळे वैद्यकीय पुरावा निश्चितपणे सरकार पक्षाच्या कथनाला पुष्टी देत नाही. सरकार पक्षाचा दावा आहे की, आरोपीने दगडाने जोरात प्रहार केला. परंतु वैद्यकीय पुराव्यात केवळ किरकोळ ओरखडे दिसतात. जर मोठ्या दगडाने प्रहार झाला असता तर अधिक गंभीर दुखापत अपेक्षित असू शकली असती. ही बाब देखील सरकार पक्षाच्या कथनाबाबत शंका निर्माण करते. म्हणून तथाकथित दुखापत आरोपीने केल्याचे सिध्द होत नाही.

१५. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६–जितेंद्र शिर्सेकर याचा पुरावा तपासल्यास तो अत्यंत औपचारिक (formal) स्वरूपाचा असून आरोपीविरुद्धच्या आरोपांना कोणतीही प्रत्यक्ष पुष्टी देत नाही. उलट, या साक्षीदाराकडून सरकार पक्षाला अपेक्षित असलेला महत्त्वाचा पुरावा समोर आलेला नाही. साक्षीदार हा प्रत्यक्षदर्शी नाही. साक्षीदाराने केवळ एवढेच सांगितले आहे की, "सुजाता लाखण हिला पायाला लागलेले असल्याने तिच्या नवऱ्याच्या सांगण्यावरून मी तिला रिक्षाने सिव्हील हॉस्पिटलला नेले." त्याने आरोपीला घटनास्थळी पाहिल्याचे सांगितले नाही. त्याने आरोपीने दगड मारल्याचे पाहिल्याचे सांगितले नाही. त्याने आरोपीने शिवीगाळ किंवा धमकी दिल्याचेही सांगितले नाही. म्हणून हा साक्षीदार घटनेचा प्रत्यक्षदर्शी ठरत नाही. दुखापत कशी झाली, कोणी केली, कोणत्या परिस्थितीत झाली याबाबत त्याच्या साक्षीत काहीही नाही.

१६. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३–गंगाराम लाखण यांनी त्यांच्या सरतपासात स्पष्टपणे सांगितले होते की, "जितेंद्र शिर्सेकर याने मला माझ्या बायकोला आरोपीने दगड मारल्याचे सांगितले." जर हा दावा खरा असता तर साक्षीदार क्र. ६ हा अत्यंत महत्त्वाचा

प्रत्यक्षदर्शी साक्षीदार ठरला असता. परंतु न्यायालयातील साक्षीत त्याने अशी कोणतीही बाब सांगितलेली नाही. त्याने आरोपीचे नाव देखील घेतलेले नाही. त्यामुळे साक्षीदार क्र. ३ च्या कथनाला पुष्टी मिळत नाही. साक्षीदार क्र. ३ च्या म्हणण्यानुसार, जितेंद्र शिर्सेकर याला घटनेची माहिती होती. मात्र साक्षीदार क्र. ६ ने न्यायालयात येऊनही आरोपीने मारहाण केल्याचा कोणताही उल्लेख केलेला नाही.त्यामुळे सरकार पक्षाचा स्वतःचा महत्त्वाचा दुवा (link evidence) तुटतो. जर पोलीस जबाबात साक्षीदाराने आरोपीविरुद्ध काही सांगितले असते आणि न्यायालयात ते सांगितले नसते, तर सरकार पक्षाला त्याला प्रतिकूल (hostile) घोषित करून उलटतपास करण्याची संधी होती. परंतु तसे करण्यात आलेले नाही. त्यामुळे न्यायालयासमोर उपलब्ध असलेली त्याची साक्ष हीच ग्राह्य धरावी लागते. त्या साक्षीत आरोपीविरुद्ध कोणताही आरोप नाही. सदर साक्षीदाराने आरोपीने घरात प्रवेश केला, आरोपीने दगड मारला, आरोपीने दुखापत केली, आरोपीने शिवीगाळ केली, आरोपीने धमकी दिली, यापैकी कोणतीही बाब सिद्ध केलेली नाही. त्यामुळे दोषारोपातील कोणत्याही आवश्यक घटकाला त्याच्या पुराव्याने आधार मिळत नाही.

१७.	अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.७– लक्ष्मण परशुराम रोकडे यांचा संपूर्ण पुरावा पाहता ते घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसून त्यांचा पुरावा पूर्णतः ऐकीव स्वरूपाचा आहे. त्यामुळे आरोपीविरुद्धचे आरोप सिद्ध करण्यासाठी त्याच्या साक्षीस अत्यल्प पुरावामूल्य आहे. उलटतपासात साक्षीदाराने स्पष्टपणे कबूल केले आहे की, "घटनेबाबत प्रत्यक्ष मला काही माहिती नाही." ही कबुली त्याच्या संपूर्ण साक्षीचे स्वरूप स्पष्ट करते. जेव्हा साक्षीदार स्वतःच प्रत्यक्ष माहिती नसल्याचे मान्य करतो, तेव्हा त्याच्या कथनाला स्वतंत्र पुरावामूल्य राहत नाही. उलटतपासात साक्षीदाराने कबूल केले आहे की,"गंगाराम व आमचे संबंध चांगले आहेत, ओळख आहे, जाणे–येणे आहे." यावरून तो फिर्यादी पक्षाच्या कुटुंबाशी परिचित व जवळचा असल्याचे दिसते. त्यामुळे त्याच्या साक्षीकडे पूर्णपणे स्वतंत्र व निष्पक्ष साक्ष म्हणून पाहता येत नाही. साक्षीदाराने असे म्हटले आहे की, "आरोपी दारु पितो, नशेत लोकांना शिवीगाळ

करतो." मात्र ही साक्ष सदर घटनेशी संबंधित नाही. ही केवळ आरोपीच्या कथित स्वभावाबाबतची सामान्य टिप्पणी आहे. एखादी व्यक्ती दारू पिते किंवा इतर वेळी शिवीगाळ करते म्हणून सदर दिवशी तिनेच गुन्हा केला असा निष्कर्ष कायद्याने काढता येत नाही.

१८. विविध साक्षीदारांच्या उलटतपासात बचाव पक्षाने असा ठोस बचाव मांडला आहे की, आरोपी व फिर्यादीच्या पतीमध्ये वाद सुरू असताना फिर्यादी मध्यस्थी करण्यासाठी गेली होती व ढकलाबुकलीत खाली पडून तिला दुखापत झाली होती. जरी साक्षीदाराने हा बचाव नाकारला असला तरी तिच्या जखमेचे स्वरूप, स्वतंत्र साक्षीचा अभाव आणि दोन्ही पक्षांतील वैमनस्य या पार्श्वभूमीवर हा बचाव पूर्णपणे अशक्य किंवा अविश्वसनीय वाटत नाही.

१९. भारतीय दंड विधान कलम ४५२ अंतर्गत दोष सिद्ध करण्यासाठी आरोपीने दुखापत करण्याची तयारी करून घरात अनधिकृत प्रवेश केल्याचे निर्विवादपणे सिद्ध होणे आवश्यक आहे. संपूर्ण साक्ष पुराव्यामध्ये, आरोपीने कोणत्या प्रकारे घरात प्रवेश केला, त्यावेळी त्याचा हेतू काय होता, तो किती वेळ घरात होता इत्यादी बाबींबाबत स्पष्ट व विश्वासार्ह तपशील आढळत नाही. साक्षीदारांनी "घाण शिव्या दिल्या" असे सामान्य स्वरूपाचे विधान केले आहे. कोणते शब्द वापरले, त्यातून शांततेचा भंग होण्याचा उद्देश कसा होता याचा तपशील नाही. तसेच कथित धमकीचे नेमके स्वरूपही सांगितलेले नाही. त्यामुळे भारतीय दंड विधान कलम ५०४ व ५०६ चे आवश्यक घटक सिद्ध होत नाहीत. सबब, वरील सर्व पुराव्याचे विवेचनावरुन मी प्रश्न क्रमांक १ ते ४ यांचे उत्तर नकारार्थी देते.

**<u>प्रश्न क्रमांक ५ बाबत</u> : –**

२०. आरोपीचे विरुद्धचा दोषारोप संशयापलीकडे शाबित करण्याइतपत सबळ पुरावा अभियोग पक्षाने न्यायालयासमोर आणलेला नाही. या कारणास्तव, आरोपीला भारतीय दंड विधान,१८६० चे कलम ४५२, ३२४, ५०४, ५०६ अन्वये दंडनीय अपराधांतून निर्दोष मुक्त

करणे क्रमप्राप्त आहे. वर नमूद कारणास्तव, प्रश्न क्रमांक ५ च्या अनुषंगाने, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी प्रकाश शांताराम पवार याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे, भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४५२, ३२४, ५०४, ५०६ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यांच्या आरोपातून, निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपीचा जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येते व त्याला मुक्त करण्यात येते.

**३.** जप्त मुद्देमाल म्हणजे हाताचे बचक्यात मावेल एवढा जांभा दगड हा मुल्यहीन असल्याने अपिलाचा कालावधी संपल्यानंतर नाश करण्यात यावा.

**४.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अन्वये जामीन कदब्याची पूर्तता करावी.

**५.** या न्यायनिर्णयाची माहिती ना.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील फौजदारी अपिल एस.टी.क्र.३९०/२०१९ च्या न्यायनिर्णयातील निर्देशानुसार जिल्हादंडाधिकारी, रत्नागिरी यांना कळविण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SUNAYANA SACHINKUMAR PINGALE
Date: 2026.06.16 17:22:35 +0530

**ठिकाण – रत्नागिरी.** **(श्रीम.एस.एस.पिंगळे)**

**दिनांक – १६/०६/२०२६** **मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.**

## -:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file Judgment are same word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.M.Jadhav |
| Court Name | :- | The Court of Chief Judicial Magistrate, Ratnagiri. |
| Date of decision | :- | 16.06.2026 |
| Judgment signed by P.O. on | :- | 16.06.2026 |
| Judgment uploaded on | :- | 16.06.2026 |